# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या/७४/२०२०.
दिनांक :-२७/०३/२०२०.

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

**विषय** :- गृहनिर्माण संस्थांना लॉगडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ** : १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम१८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१.
३. महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना२०२०/ प्र.क्र५८/ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०.
४. महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना२०२०/ प्र.क्र५८/ आरोग्य, दिनांक १४ मार्च २०२० अन्वये महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
५. मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील जा.क्र.जिकाठा/ जि.आ.व्य.कक्ष/टे-१/कोरोना विषाणु/२१/२०२०. दि. २६/०३/२०२०.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम २(अ) नुसार मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भिय क्र.३ अन्वये कोरोना विषाणुचा कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. तसेच त्याबाबतची नियमावली प्रसिद्ध केली असुन महानगरपालिका **आयुक्त** यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी **सक्षम प्राधिकारी** म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ स्वच्छता विषयक खास उपाय योजना, नियम ३१९ अन्वये कोणत्याही दुर्धर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास आयुक्तास, खास उपाययोजना करता येतील.

त्याअर्थी, कोव्हिड १९ निर्मुलनासाठी शासनाने दि. १४/०४/२०२० पर्यंत लॉगडाऊन घोषित केली असुन कलम १४४ लागु करुन संचारबंदी लागु केली आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी जनतेने घराबाहेर न पडणे, गर्दी निर्माण करणा-या घटना टाळाव्यात याबाबत दक्षता घेणे आवश्यक असताना प्रत्यक्षात मात्र भाजीपाला, किराणा इ. खरेदीसाठी दुकानात गर्दी निर्माण होत आहे. यातून विषाणुला प्रतिबंध होणे शक्य नाही. तरी सदरचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रत्येक गृहनिर्माण संस्थाच्या पदाधिका-यांवर यांच्या संस्थेतील सभासद जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदीसाठी घराबाहेर पडुन अनावश्यक गर्दी टाळण्याची जबाबदारी सोपविण्यात येऊन त्यानुसार प्रत्येक गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-यांनी पुढील प्रमाणे जबाबदारी पार पाडण्यासाठीचे आदेश देण्यात यावेत.

१. संस्थेच्या गेट जवळ सॅनिटायझर्स ठेऊन प्रवेश करणा-या प्रत्येक व्यक्तीला हात स्वच्छ करुनच सोसायटीमध्ये प्रवेश द्यावा.
२. इंटरकॉमद्वारे प्रत्येक सदस्यास आवश्यक असणा-या किराणा, भाजीपाल इ. गोष्टीची मागणी गोळा करावी व त्यानुसार जवळच्या किराणा, भाजीपाला वैगेरे जीवनावश्यक वस्तुची ऑर्डर (सदस्य निहाय) देऊन सामान सोसायटीच्या गेटवरतीच मागवून घेणे. एकेका सदस्यांच्या घरी सिक्युरिटी मार्फत सदरचे सामान पोहचवावे वा प्रत्येक घरातील ०१ सदस्यास बोलवुन गेटवरती सदर सामानाचे वाटप करावे मात्र हे करताना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.



Scanned with CamScanner

३. सोसायटीतील सदस्य तातडीच्या न टाळता येणा-या कारणाशिवाय बाहेर जाणार नाहीत याची दक्षता संस्थेच्या पदाधिका-यांनी जातीने घ्यावी. तसेच सोसायटीच्या क्लब हाऊस, बगीचा येथे सदस्य वा लहान मुले एकत्र घेणार नाही याबाबत योग्य ती दक्षता वा प्रतिबंधात्मक उपाय योजावेत.

या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल संबंधित अधिकारी यांनी निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

(सही/-)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

प्रति,
१. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५.
२. प्रभाग आरोग्य निरीक्षक, प्रभाग समिती क्र.१ ते ५.
३. विभाग प्रमुख, (शहर विकास विभाग).

**प्रतः माहीतीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

विभागप्रमुख (जाहिरात).

/- यांनी सहा.आयुक्त प्र.स.क्र. १ ते ५ यांचेकडुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल एकत्रित करुन तात्काळ निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

**प्रतः माहीतीस्तव.**
१. मा.पोलिस उप-आयुक्त(परिमंडळ -२), भिवंडी.
२. उप-आयुक्त (मुख्या.).
३. उप-आयुक्त (सार्व.आरोग्य).
४. सर्व नियंत्रण् अधिकारी.
५. सर्व विभागप्रमुख.
६. जनसंपर्क अधिकारी.
७. आस्थापना निवड नस्ती.

**प्रतः** माहितीस्तव .
१. मा.महापौर.

(डॉ.प्रविण आष्टीकर)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका



Scanned with CamScanner